Vol II Issue XII June 2013

Impact Factor : 1. 2018

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 1. 2018**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 12, June. 2013
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

ORIGINAL ARTICLE

GRT

# *सहकारी साखर कारखान्यातील ऊस तोडणी कामगार व वाहतूक कामगारांची गरज व उपाययोजना*

*प्रताप बापूसो लाड*

क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय
कुंडल.

सारांश

भारत हा कृषीप्रधान देश. या देशात मोठया प्रमाणावर ऊस शेती केली जाते. यावर आधारित भारताच्या कृषि औद्योगिक क्षेत्रात साखर उद्योग हा महत्वाचा व मोठा उद्योग म्हणून उदयास आला आहे. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर राज्यात सहकारी साखर कारखान्यांची संख्या वाढत गेली. म्हणूनच महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यानी ग्रामीण विकास आणि परिवर्तनाचे साधन म्हणून महत्वाची भूमिका बजावली आहे.

प्रस्तावना

महाराष्ट्रात 1960–61 मध्ये 20 सहकारी व 12 खाजगी असे एकूण 32 साखर कारखाने होते. 1999–2000 मध्ये सहकारी क्षेत्रात 123 व खाजगी क्षेत्रात 10 साखर कारखाने होते. 2010–2011 मध्ये 40 खाजगी व 167 सहकारी असे एकूण 207 साखर कारखाने आहेत.

अशापकारे जसजसे साखर कारखाने वाढले तसतशी तोडणी आणि वाहतूक या कामासाठी लागणा–या मजूरांच्या संख्येत वाढ झाली.

ऊस तोडणी मजूर आणि वाहतूक कामगार हे सहजासहजी मिळत नाहीत. ते दुष्काळी भागातून आणावे लागतात आणि तेही गरजेपोटी हंगामी स्थलांतरणासाठी तयार होतात. 1972–73 साली जो भीशण दुष्काळ पडला त्यामुळे कोरडवाहू शेती क्षेत्रातील शेतमजूर, सिंचित क्षेत्राकडे वळू लागले. साखर कारखाना व्यवस्थापकांनी त्याचा फायदा घेत मध्यस्थांकरवी कामगार पुरविण्याच्या अटीवर कंत्राटदारांना वित्तीय अग्रीमे दिली. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतमजूर अल्पभूधारक आणि भूमिहीन शेतमजूरांना रोजगाराचा लाभ मिळाला. सोबत जनावरांना चाराही उपलब्ध झाला.

यामार्गाने साखर कारखान्यांची उन्नती झाली. पण ऊस तोडणी व वाहतूक कामगारांचे शोषणच होत राहिले आणि ते आजही चालूच आहे.

### *अभ्यासपध्दती*

सहकारी साखर कारखान्यातील ऊस तोडणी कामगार व वाहतुक कामगारांची गरज व उपाययोजना या शोधनिबंधासाठी विविध संकेतस्थळावरुन, शोधनिबंधावरुन व विविध संदर्भग्रंथाच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीच्या आधारे लेखन केले आहे.

### *अभ्यासाची उद्दिष्टे*

1.ऊस तोडणी व वाहतुक कामगारांच्या समस्येचा अभ्यास करणे.
2.कामगारांचे महत्व जाणून घेणे.
3.कारखानापातळीवरील उपाययोजनांचा अभ्यास करणे.

### *अभ्यासाची गृहिते*

1.ऊस तोडणी व वाहतुक कामगारांना वेळच्यावेळी योग्य मोबदला दिल्यास त्यांचा आर्थिक, सामाजिक दर्जा सुधारण्यास मदत होईल.
2.ऊस तोडणी कामगारांना सोई–सुविधा पुरवल्यास त्यांची समाजातील पतप्रतिश्ठा वाढण्यास मदत होईल.

### *ऊस तोडणी व वाहतूक कामगार*

*व्याख्या*

" जी व्यक्ती साखर कारखान्यास लागणा–या ऊसाची तोडणी व ऊसाची वाहतूक करण्याच्या कामात प्रत्यक्ष सहभागी होते, त्यांना ऊस तोडणी कामगार असे संबोधतात. "

### *ऊस तोडणी व वाहतूक कामगारांची संख्या*

सर्वसाधारण पणे 5000 टन गाळप क्षमता असलेल्या साखर कारखान्यांसाठी 15,000 ते 16,000 हंगामी मजूर उ८स तोडणी आणि वाहतूक कामासाठी आवश्यक असतात.

कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्या मते, 1960 मध्ये महाराष्ट्रातील 27 साखर कारखान्यात 45,520 ऊस तोडणी आणि वाहतूक

कामगार होते.

कामगार आयुक्त मुंबई यांच्या सामाजिक, आर्थिक सर्व्हेक्षणानुसार 1885–86 मध्ये 89 साखर कारखान्यामध्ये ऊस तोडणी आणि वाहतूक कामगारांची संख्या 2,12,135 होती. त्यापैकी 1,08,300 स्थलांतरित मजूर 18 जिल्हयातून आलेले होते. त्यापैकी बीड, अहमदनगर, जळगांव, सोलापूर, औरंगाबाद, नाशिक या जिल्हयातून 84: मजूर आलेले होते.

सतत दुष्काळी परिस्थिती व गरजेनुसार काम मिळवण्याची शाश्वती असल्यामुळे ऊस तोडणी व वाहतूक कामगारांमध्ये 3 पट वाढ झाली. याशिवाय अनियमित कामगारांची संख्या 1 लाखाहून अधिक आहे. 55,000 कुटूंबे या व्यवसायात असून आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, राज्यात महाराष्ट्रातून ऊस तोडणी व वाहतूक कामगार ऊस तोडणीसाठी जातात.

### *ऊस तोडणी व वाहतूक कामगारांच्या समस्या*

1.वेळेवर वैद्यकीय सेवा उपलब्ध होत नाहीत.
2.गंभीर अपघातात नुकसान भरपाई मिळत नाही.
3.सर्वच ठिकाणी कामगारांच्या मुलांना शाळेची व्यवस्था मिळत नाही.
4.ऊस तोडणी वाहतुकीचे दर पुरेसे नाहीत.
5.कामगारांना बॅंकेमार्फत कर्ज मिळत नाही.
6.ठेकेदारांमार्फत भरती केल्यामुळे त्यांची मोठया प्रमाणावर पिळवणूक होते.
7.साखर कारखान्यातील कामगाराचा दर्जा न मिळाल्याने त्यांना साखर कारखान्यातील कामगारांचे फायदे व सवलती मिळू शकत नाहीत.

### *वरील समस्या सोडविण्यासाठी*

अ)कामगार संघटना
ब)साखर कारखाना
क)शासकीय स्तरावर प्रयत्न झाले आहेत.

### *उपाययोजना*

1.या कामगारांनी दरवर्षी साखर कारखाना न बदलता एकाच साखर कारखान्यात सातत्याने काम करावे यासाठी या कामगारांचे प्रबोधन करावे व त्यामुळे होणारे फायदे पटवून द्यावेत.
2.ऊस तोडणी व वाहतूक कामगारांच्या राज्यात अकरा संघटना नोंदणीकृत आहेत. परिणामी, या कामगारांची सौदा शक्ती कमी होते, म्हणून सर्व मतभेद विसरुन राज्य पातळीवर या कामगारांची एकच संघटना स्थापन करण्यांत यावी ही संघटना राजकीय व्यक्ती आणि राजकीय पक्षापासून अलिप्त असावी.
3.ऊस तोडणी व वाहतूक कामगारांना साखर कारखान्याचे कामगार म्हणून मान्यता मिळावी यासाठी संघटना पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे.
4.ऊस तोडणी आणि वाहतूक कामगार संघटनेची प्रत्येक साखर कारखान्यात स्थानिक संघटना असावी या स्थानिक संघटनेने या कामगारांचे प्रबोधन करावे व त्यामुळे होणारे फायदे पटवून द्यावेत.
5.दर तीन वर्षानी लवाद नेमला जावा यासाठी या कामगारांच्या संघटनेने सरकार व महाराष्ट्र राज्य साखर संघावर अंकुश ठेवला पाहिजे.

### *साखर कारखाना पातळीवर उपाययोजना*

1.ऊस तोडणी आणि वाहतूक कामगार कुटूंबाचे स्थलांतरित घर कोणत्याही प्रकारच्या सोई नसलेले असते, म्हणून साखर कारखाने ऊस तोडणी आणि वाहतूक कामगारांसाठी आपल्या कार्यक्षेत्रात पक्की घरे बांधावीत व तिथे किमान आवश्यक सोयी उपलब्ध करुन द्यावी.
2.मोफत वैद्यकीय सेवांची उपलब्धता द्यावी.
3.ऊस तोडणी करतांना कपडे फाटतात, झिजतात त्यामुळे कारखान्यांच्याकडून त्यांना अंगभर कपडे व लाईटवेट हेलमेळ हे किमान साहित्यही कामगारांना साखर कारखान्यांकडून उपलब्ध करुन दिले पाहिजे.
4.ठेकेदार ऊस तोडणी आणि वाहतूक कामगारांना धान्य व किराणा माल पुरवून त्यांचे आर्थिक शोशण करतात, म्हणून कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात ठिकठिकाणी सहकारी ग्राहक भांडारे सुरु करावीत.
5.गळीत हंगाम काळात साखर कारखाना तांत्रिक कारणांमुळे बंद पडल्यास अशा बंदच्या काळात साखर कारखान्याने ऊस तोडणी आणि वाहतूक कामगारांना किमान वेतन द्यावे.
6. 5 वर्षाच्या आतील कामगारांच्या मुलांसाठी साखर कारखान्यांनी जिल्हा परिषद, तालुका पंचायत, स्वयंसेवी संस्था इ. मदतीने बालसंगोपन, अंगणवाडी, सकस आहार योजना इ. सुरु कराव्यात.

### *शासकीय स्तरावरील उपायोजना*

1.बलमजुरांची सुटका करुन त्यांच्यासाठी पर्यायी शिक्षणाची व्यवस्था करणे, बाल कामगार प्रतिबंधामुळे आर्थिक नुकसान होत असलेल्या कुटूंबाचे पुर्नवसन तंत्रज्ञानाधारित व्यवसायपूरक प्रशिक्षण देणे आणि त्यांच्या भविश्यासाठी विकास निधी राखून ठेवणे.
2.ऊस तोडणी आणि त्यांची त्यांची वाहतूक करणे हे जड आणि कष्टाचे काम आहे. 50 वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या ऊस तोडणी आणि वाहतूक कामगारांना हे काम करणे अशक्य होते, म्हणून सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवून साखर कारखान्यांनी अशा कामगारांना हलकी, सोयीस्कर कामे द्यावीत.
3.सामंजस्य कराराच्या ज्या अटी व शर्ती असतात त्यापैकी काही शर्तीची अंमलबजावणी दंडात्मक कारवाई करावी.
4.ऊस तोडणी आणि वाहतूक कामगारांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी सरकारने शिश्यवृत्ती सुरु करावी.

### समारोप

ऊस तोडणी आणि वाहतूक कामगारांचे काम प्रचंड मेहनतीचे असूनही त्यांना कामाचा मोबदला मात्र कमीच मिळतो. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती हलाखीचीच आहे. जोपर्यंत या कामगारांची संघटना नव्हती, तोपर्यंत मागण्यांची कोणीही दखल घेत नव्हतं. आता संघटना अस्तित्वात आल्याने आंदोलन करुन मागण्या मान्य करुन घेतल्या जातात. मात्र त्यांच्या अंमलबजावणीसाठी सरकार, साखर संघ, साखर कारखाना पैकी कोणीही आग्रही नाही. या कामगारांसाठी सर्व सोई सुविधायुक्त पक्की घरे, वैद्यकिय सुविधा, सहकारी ग्राहक भांडारे, मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, आश्रम शाळा, कामगारांची डायरेक्ट भरती, निवाडयातील तरतूदीची अंमलबजावणी, कामगार कल्याण योजना या कामगारांसाठी खास कायदा स्वतंत्र महामंडळ सुरु करणे इ. उपाययोजना केल्यास त्यांचे प्रश्न सुटण्यास मदत होईल.

'' विद्या नाही मेंदूत, कौशल्य नाहीत हातात, पैसे नाहीत खिशात, कर्जाचा बोजा, नि साधनसंपत्तीचा अभाव , अडाणीपणा आणि अंधश्रध्दा '' या भोव–यात सापडलेला हा दुश्काळी भागातून आलेला, राबणारे हात व भाकरी मागणारी आतडी बरोबर घेवून फिरणा–या ऊस तोडणी आणि वाहतूक कामगारांचे वेतन आणि औद्योगिक संबंधाच्या ओघाने येणारे काही प्रश्न आजही अनुत्तरीत आहेत.

### संदर्भग्रंथ

1.www.co-operative.industry.com.
2.www.maharashtraco-operative.com.
3.सहकार महाराष्ट्–नोव्हेंबर–डिसेंबर 2004 वर्ष 44 वे अंक 1 व 2, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे–1.
4.कामत गो.स., सहकार तत्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, श्री विद्या प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net